नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/११/२०२६ (गुरूवार)

८.१४० किलोग्रॅम अंमलीपदार्थ गांजा ०२ लाख ०६ हजारांचा मुद्देमाल जप्त, आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक
नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात अंमली** पदार्थ विरोधी कारवाई पथक नागपुर ग्रामीण आणि केळवद पोलीसांनी संयुक्त कारवाई करत **दिनांक ०४/११/२०२६ रोजी अवैध गांजा साठवणुक , विक्री तसेच लागवड करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंदवुन ८.१४० किलोग्रॅम गांजा जप्त केला.**

दिनांक ०४/११/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली की, **तेलंगखेडी गावात एक इमस नामे बंडू कृष्णाजी क्षीरसागर हा त्याच्या राहत्या घरी अंमली पदार्थ गांजाची साठवणूक व विक्री करत आहे.** नमुद पथकाने मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन केळवद पोलीसांसह संयुक्त कारवाई करत आरोपी **नामे बंडू कृष्णाजी क्षीरसागर, वय ६४ वर्ष, रा.णार तेलंगखेडी, ता. सावनेर, जि. नागपूर** याचे घराची घरझडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. आरोपीचे घरी ५.०८८ किलोग्रॅम गांजा मिळून आला व आरोपीस अंमली पदार्थ गांजाबाबत अधिक विचारपूस केली असता आरोपीने त्याच्या तेलंगखेडी शिवारातील शेतात गांजाच्या झाडाची

लागवड केल्याची माहिती दिल्याने नमुद त्याचे शेतामध्ये जाऊन पाहणी केली असता गांजाचे दोन झाडाची लागवड केले असल्याचे दिसून आले.

पोलीसांनी १) घरातुन जप्त केलेला हिरवे पाने फुले बिया व बोंड असलेला गांजा ५.०८८ किलोग्रॅम किंमती १,२७,२००/— रूपये , २) दोन गांजाची झाडे वजन ३.०५२ किलोग्रॅम किंमती ७६,३००/— रूपये ३) एक कीपॅड मोबाईल किंमती २५००/— रूपये ४) एक चिनी मातीची चिलम किंमती ५०/— रुपये आणि ईतर साहित्य असा एकुण २,०६,१३०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ८(क), २० (ब) (ii) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आले आहे.



डायल ११२ सेवेत नागपूर ग्रामीण पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी ऑक्टोबर २०२६ मध्ये राज्यात सहावा क्रमांक प्राप्त

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण ,श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधीक्षक गृह, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीसांनी डायल ११२ आपत्कालीन प्रतिसाद सेवेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ऑक्टोबर महिन्यात डायल ११२ सेवेमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने राज्यात सहावा क्रमांक प्राप्त केला असून, आपत्कालीन कॉल प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी पोहोचण्याचा सरासरी प्रतिसाद वेळ ४.०३ मिनिटे इतका राहिला आहे.

नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ, प्रभावी व गुणवत्तापूर्ण पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

सावनेर बस स्थानक परिसरात पोलीसांची सातत्याने पेट्रोलिंग व नागरिकांना जनजागृती

पोलीस स्टेशन सावनेर :— दिनांक ०४/११/२०२६ चे एका वृत्तपत्रात बसस्टैंड क्षेत्र मे चोरो का पहरा अशा शिर्षकाखाली सावनेर बस स्टँड बाबत प्रसारीत झालेल्या बातमीच्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, सावनेर पोलीस स्टेशनतर्फे बस स्टँड परिसर आणि आसपासच्या गर्दीच्या ठिकाणी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यांकडून सातत्याने आणि नियमितपणे गस्त घालण्यात येते. गर्दीच्या वेळी कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस स्वत: उपस्थित राहून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करतात व प्रवाशांना आपला मोबाईल, पर्स, दागिने व इतर मौल्यवान ऐवज सुरक्षित ठेवण्यासाठी सतत मार्गदर्शन व जनजागृती करतात.

मागील एका वर्षाच्या कालावधीत सावनेर बस स्टँड परिसरात चोरीच्या एकाही घटनेची नोंद नाही. पोलीस संध्याकाळच्या व गर्दीच्या वेळी स्वत: पायी गस्त घालून परिस्थितीवर नियंत्रण ठेवून असतात. सावनेर पोलीस प्रशासन नागरिकांच्या व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे कटिबद्ध असून परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व उपाययोजना केल्या आहेत.


POLO



अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद भिवापूर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापूर :— दिनांक ०४/११/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी अन्नपुर्णा हार्डवेअर दुकानाचे समोर शिवाजी ले आउट भिवापुर येथे नाकाबंदी केली असता संशयीत ट्रॅक्टर हे ट्रॉलीसह मिळुन आले. वाहन थांबवुन पाहणी केली असता ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/ सी एच ८४०७ आणि ट्रॉली विनाक्रमांकाचे असल्याचे दिसले. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली सदर वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, आरोपी नामे **उमेश रामदास भलावी, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र ०२ दिघोरा भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता आरोपी मालक नामे **निलेश धोंडु पाल वय ४०वर्ष रा वार्ड क्र ०१, दिघोरा भिवापुर, ता. भिवापूर** असल्याची माहीती प्राप्त झाली. चालकाला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता.

पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र. एम एच— ४०/ सी एच— ८४०७ किंमती ४००,०००/—रूपये आणि विनाक्रमांकाची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये, १ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये आणि ०१ मोबाईल असा एकुण ५,०६,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन नमुद चालक व मालक यांच्या विरूध्द कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ५०/१७७, ३(१)/१८१ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २३ हजार ४७० रूपयांचा मुद्देमाल जप्त
उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक ०४/११/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, भाईजी हॉटेल मंगळवारीपेठ उमरेड येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भाईजी हॉटेल मंगळवारीपेठ उमरेड येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) नागराज श्रीराम त्रिपाठी, वय २९ वर्ष, रा. आर्वी, जि. वर्धा २. बाबुराव लक्ष्मणराज गंघम, वय ४५ वर्ष, रा. अरुण नगर उमरेड ३. कडेम नागेश दारगया, वय ३४ वर्ष, रा. नेर, ता. नेर, जि. यवतमाळ ४. श्याम दत्तु त्रिपाठी, वय २४ वर्ष, रा. साईनगर आर्वी, जि. वर्धा ५. संदीप भिमराव खटे, वय २१ वर्ष, रा. साईनगर आर्वी, जि. वर्धा ६. अशोक बाबु पस्तम, वय ३० वर्ष, रा. अम्मापुरा, ता. जि. महेबाज राज्य तेलगंणा, ह. मु. मोहाडी, तुमसर ७. लच्छीराम नेपाल किन्नरा, वय २८ वर्ष, रा. वरंगले, ता. जि. हैदराबाद, ह. मु. बालाघाट मध्यप्रदेश यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम १३,४७०/—रूपये, ०२ ॲडरॉईड मोबाईल असा एकुण २३,४७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

अवैध दारू विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०६ गुन्हे दाखल

दिनांक ०४/११/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची विक्री, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०६ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन भिवापूर येथे आरोपी नामे शुभम अरूण कोडापे, वय २८ वर्ष, रा. गरपेठ नांद याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे श्रावण फत्तेसिंग जाधव, वय ७० वर्ष, रा. मांडवा भिवापुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे तानाजी सिताराम ढोबळे, वय ५५ वर्ष, रा. मोहगाव (भदाडे) तह. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे शुभम सुखदेव मेश्राम, वय ३० वर्ष, रा. नयाकुंड, ता. पारशिवनी, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे लालुकुमार बिसो यादव, वय २७ वर्षे, रा. बिरपुर टोला, जि. सारथा, ह. मु. सावळी, ता. कामठी, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे प्रविण दादाराव घुगल, वय ४७ वर्ष, रा. सावळी (मो.), ह. मु. उमरी (भ.), ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद,

नमुद कारवाईत एकुण ३८७० मिली देशी दारू, ४० लिटर मोहाफुल दारू असा एकुण ५७९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर